**ई-प्रशासन धोरणांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी समिती (पी आय सी) स्थापन करणेबाबत**

## महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
शासन निर्णय क्र. मग्रारोहयो/निवि/२०१४-१५/प्र.क्र. २६/रोहयो-९दि.३० ऑक्टोबर, २०१४

**वाचा :** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.मातंस-२०११/प्र.क्र.१२५/३९,दि. २३.०९.२०११.

राज्याच्या ई-प्रशासन धोरणांतर्गत माहिती तंत्रज्ञान उत्पादने आणि सेवा मिळण्याबाबत दि. २३.०९.२०११ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शन देण्यात आलेले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत राज्यात पुर्ण झालेल्या कामांचे भौगोलिक माहिती प्रणालीआधारीत मत्तांचे मॅपिंग(GIS Based Assets Mapping)करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, ई-प्रशासन धोरणांतर्गत विभागाची प्रकल्प अंमलबजावणी समिती (पी आय सी) स्थापन करण्याचे विचाराधीन आहे.

### <u>शासन निर्णय :-</u>

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत राज्यात पुर्ण झालेल्या कामांचे MRSAC नागपूर या संस्थेमार्फत भौगोलिक माहिती प्रणाली आधारीत मत्तांचे मॅपिंग (GIS Based Assets Mapping)करावयाचे असून, सदरील प्रकल्प अंमलबजावणी करण्याकरीता नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) या विभागाची खालील प्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समिती (पी आय सी) स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, उद्योग विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४. | प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर | सदस्य |
| ६. | माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत जाहिर करण्यात आलेल्या तंत्र मंडळातील तज्ञ | सदस्य |
| ७. | उप सचिव (रोहयो) | सदस्य सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४१०३११६०८५३५११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vimala R

Digitally signed by Vimala R
DN: CN = Vimala R, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Planning Department
Date: 2014.10.31 18:26:48 +05'30'

(आर. विमला)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे स्वीय्य सहाय्यक
२. प्रधान सचिव, उद्योग विभाग यांचे स्वीय्य सहाय्यक
३. प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय्य सहाय्यक
४. सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग यांचे स्वीय्य सहाय्यक
५. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
६. संचालक, माहिती तंत्रज्ञान यांचे स्वीय्य सहाय्यक
७. उप सचिव (रोहयो) यांचे स्वीय्य सहाय्यक
८. निवडनस्ती